**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
नवीन मध्यवर्ती इमारत, ५ बी. जे. रोड, पुणे-४११००१
दूरध्वनी : ०२०-२६१२२८४६/४७ E-Mail - comm.audit.18@gmail.com

जा.क्र. : सआ२०/लेखापरीक्षण/लेखापरीक्षक नामतालिका/मुदतवाढ/९८००/२०२३, दिनांक : ०६.११.२०२३

प्रति,
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व.
जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, सर्व.

**विषय :सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी प्रस्तावित असलेल्या लेखापरीक्षकांच्या नामतालिकेवर ऑनलाईन अर्ज करणेस मुदतवाढ प्रदान करणेबाबत.**

संदर्भ - परिपत्रक जा.क्र.सआ-२०/लेखापरीक्षण/लेखापरीक्षक नामतालिका सन २०२४-२०२६/१५८१/२०२३ दिनांक १६/१०/२०२३

उपरोक्त् संदर्भांकित विषयाचे अवलोकन व्हावे.

सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी सन २०२४ ते २०२६ या कालावधीची नामतालिका ऑनलाईन पध्दतीने तयार करणेचे कामकाज सद्यस्थितीत प्रस्तावित आहे. संदर्भांकित परिपत्रकान्वये याबाबतच्या सकल सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये नामतालिकेसाठी अर्हताधारक लेखापरीक्षकांनी ऑनलाईन अर्ज करणेसाठीची मुदत दि. २३ ऑक्टोबर ते ०६ नोव्हेंबर २०२३ अशी एकूण १५ दिवसांसाठी निर्धारित केलेली आहे. प्रत्यक्षात ऑनलाईन अर्ज करणेचा अवधी आज रोजी संपुष्टात येत आहे.

सर्व प्रकारच्या लेखापरीक्षकांनी व त्यांच्या संघटनांनी विविध कारणे नमुद करून ऑनलाईन अर्ज सादर करणेसाठीच्या कालावधीस मुदतवाढ प्रदान करणेबाबत विनंती केलेली आहे. तदनुषंगाने सर्व बाबींचा विचार करून ऑनलाईन अर्ज सादर करणेसाठी लेखापरीक्षकांना दि. १५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ प्रदान करणेत येत आहे. संबंधीत सर्व घटकांना सदरहू वाढीव मुदतवाढ अवगत करावी.

जिल्हास्तरीय छाननी समितीस त्यांचे कामकाज करणेसाठी संदर्भाधिन परिपत्रकान्वये निर्धारित करून दिलेल्या कालावधीमध्ये कोणताही बदल करणेत आलेला नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**(अनिल कवडे)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत - पुढील उचित कार्यवाहीसाठी**
**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) सर्व.**